# सप्तपदी संकल्पांची

गेल्या आठवड्यापर्यंत ऑक्टोबर हिट सारखं डिसेंबरमध्येच उकडत असल्याने हे वर्ष संपतच नाहीये असं वाटत होतं. पण दोन-तीन दिवसांपासून आता जरा थंडी पडली आणि अखेर वर्ष संपत आल्याची जाणीव होऊ लागली. वर्ष संपण्याची जाणीव होते त्याच बरोबर नवीन वर्ष आता काय काय घेऊन येणार आहे याचीही उस्तुकता मनात दाटून येते.

गुलाबी थंडीच्या याच दिवसात आपण वर्षभरासाठीचे काही संकल्प करतो. आपल्यातल्या बहुतेकांचे (माझ्यासह!) या यादीतले अनेक संकल्प पुरे होत नाही हे खरं असूनही आपण नवीन संकल्प करतो ते पुरे करण्याचा प्रयत्नही करतो. गेले जवळपास वर्षभर आपण लाग्नाशिया संबंधित विविध विषयांवर गप्पा मारल्या, चर्चा केली, मंथन केलं. मी माझे अनुभव मांडले, अनेकांनी त्यांच्या प्रतिक्रिया आणि त्यांचे अनुभवही कळवले. या सगळ्यातून माझंही जाणीवांचं विश्व विस्तारत गेलं. त्याच पार्श्वभूमीवर आता २०१५ अस्ताला जात असताना आपण सर्वांनीच आपल्या नात्यांसाठी, बंध-अनुबंधांसाठी काही संकल्प करावेत असं माझ्या मनात आलं. कोणते बरं हे संकल्प असावेत याचा मी विचार केला तर सात गोष्टी माझ्या डोळ्यासमोर आल्या. संकल्पांची सप्तपदीच जणू!

१) <u>सुसंवाद- </u>जगाच्या पाठीवरच्या सर्व नात्यांच्या यशाचा पाया या एका शब्दात दडला आहे. वाद नव्हे संवाद; नुसता संवाद नव्हे सुसंवाद! नात्याचं सुंदर मंदिर बांधायचं तर पाया चांगला मजबूत हवा. कोणतंही नातं घ्या, पालक-मुलं, मित्र-मैत्रिणी, शिक्षक-विद्यार्थी, बॉस-कर्मचारी, नेता-कार्यकर्ता, अभिनेता-दिग्दर्शक, डॉक्टर-पेशंट असं अगदी कोणतंही नातं घ्या. ते फुलतं सुसंवादाच्या पायावरच. नवरा-बायकोचं नातं याला अपवाद कसं असणार! त्यामुळे

नववर्षासाठी सगळ्यात महत्वाचा संकल्प म्हणजे ‘माझ्या सर्व नात्यांमध्ये मी स्वतःहून सुसंवाद राखण्याचा प्रयत्न करेन’. यातला ‘स्वतःहून’ हा शब्दही तितकाच महत्वाचा आहे हां!

२) स्वीकार- जोडीदाराचा विनाअट स्वीकार ही नात्यातली अत्यावश्यक बाबच म्हणावी लागते. स्वीकारचा अर्थ समोरच्यामधलं सगळं आवडणं नव्हे, किंवा स्वीकार म्हणजे ‘तडजोड’ही नाही. तडजोड म्हणजे नाईलाजातून येणारी गोष्ट असते. स्वीकार म्हणजे स्वतःहून जोडीदाराला त्याच्या/तिच्या गुणदोषांसह आपलंसं करणं.

३) आदर- ‘मी समोरच्याच्या मतांचा, स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा आदर, स्वातंत्र्याचा, वेगळ्या आवडी-निवडींचा आदर करेन’. ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाही हं. आपला तो बाब्या आणि शेजारचा तो कार्टा या धर्तीवर आपण अनेकदा विचार करतो. आपल्याही नकळत जोडीदाराच्या मतभिन्नतेची, आवडींची खिल्ली उडवतो, कमी लेखतो, अनादर करतो. आणि मग इथेच चीर पडते आणि नाती ढासळत जातात. हे टाळण्याचा संकल्प करूया.

४) विश्वास- सुसंवाद-स्वीकार-आदर या त्रयीमधली सगळी हवाच निघून जाईल जर नात्यात विश्वास नसेल. अनेकदा अविश्वासाच्या मूळाशी विसंवाद, अनादर याच तर गोष्टी असतात. विश्वास दिल्याशिवाय मिळत नसतो आणि विश्वासाशिवाय नातंच तयार होऊ शकत नाही. विश्वास म्हणजे नात्याच्या रूपातल्या मंदिराच्या भिंती आहेत. नात्यांत विश्वास निर्माण करणं, फुलवणं हे यावर्षीच्या संकल्पांच्या सप्तपदीमधील महत्त्वाचे पाउल.

५) स्वातंत्र्य- नात्याच्या मंदिरात हवा चांगली खेळती राहायला हवी, पूर्वेच्या उगवत्या सूर्याचा स्वच्छ सूर्यप्रकाश आत शिरायला हवा. आणि त्यासाठी या मंदिराच्या सभामंडपाला भव्य प्रवेशद्वार आणि बाजूला खिडक्याही असायला हव्यात. हे प्रवेशद्वार अन् खिडक्या

म्हणजेच स्वातंत्र्य. स्वातंत्र्याशिवाय नात्याचा जीव घुसमटेल, हवा कोंदट आणि रोगट होईल. स्वातंत्र्य हे नात्यालाच नव्हे तर प्रत्येक माणसाला माणूस म्हणूनही फुलवतं, अधिक प्रगल्भ करतं. आणि जोडीदार या नात्याने त्या फुलण्याला, प्रगल्भ होण्याला हातभार लावणं आपलं कर्तव्य आहे. आणि हे कर्तव्य पार पाडण्याचा संकल्प आज करूया.

६) <u>जबाबदारी-</u> ज्याला कसली जबाबदारी घ्यायची नाही, निभावायची नाही त्याने नात्यांच्या फंदातच पडू नये. पण नाती निर्माण करणं, जपणं, समृद्ध करणं हे सगळं करू बघणाऱ्याला जबाबदारी घेणं आणि निभावणं यापासून पळता येणार नाही. जबाबदार असणं याचा अर्थ निव्वळ भौतिक गरजांची जबाबदारी घेणं नव्हे. इंग्रजीतल्या Responsiblity, Answerablity, Accountablity या सर्व शब्दांना मिळून मी इथे जबाबदारी शब्द वापरते आहे. मंदिराचं छत म्हणजे जबाबदारीची जाणीव. ही जाणीव असली म्हणजे नात्यात रंगत येऊ लागते. तुझं-माझं न राहता नात्याचा प्रवास 'आपलं' कडे होऊ लागतो. अहं कमी व्हायला सुरुवात होते. जबाबदार बनणं, उत्तरदायी होणं हा या सप्तपदीमधला अत्यंत महत्त्वाचा टप्पा.

७) <u>बांधिलकी-</u> सुसंवाद पाया असेल तर बांधिलकी हा कळस आहे. बांधिलकी हा शब्द मला फार आवडतो. त्याच्यात बंधन तर आहे, पण बंधनाची जाचकता नाही. उलट बांधिलकी या शब्दात उत्कट प्रेमाच्या बंधनासोबत आलेली आपुलकी आहे असं वाटतं. उत्तरदायित्व, निष्ठा, आपुलकी यांचा मिलाफ म्हणजे बांधिलकी. इंग्रजीत ज्याला commitment म्हणलं जातं. नात्याचा हा सर्वोत्तम बिंदू. विश्वासाच्या, जबाबदारीच्याही पलीकडे. नात्याला पूर्णत्व येतं

ते बांधिलकीमुळे. या बांधिलकीचा कळस आपल्या नात्यांवर चढवण्याचा आणि नाती सजवण्याचा संकल्प करूया.

आपल्या इतर सर्व संकल्पांइतकीच, किंबहुना त्याहून जास्तच, ही संकल्पांची सप्तपदी अवघड आहे. पण माणूस हा आहे सामाजिक प्राणी. स्वतःच्या मानसिक-शारीरिक-भौतिक-अध्यात्मिक गरजा पूर्ण करण्यासाठी आपल्यासारख्या इतर जीवांची त्याला गरज भासते. कोणतीही दोन माणसं एकत्र आली की नातं तयार होतं. अशी असंख्य नाती आपण आपल्या आयुष्यात निर्माण करत असतो. नाती तर आपल्या आयुष्यात राहणार आहेतच. मग ही नाती अधिक समृद्ध, अधिक प्रगल्भ करण्यासाठी का प्रयत्न करू नयेत? आणि हे प्रयत्न सुरु करण्यासाठी, नववर्षासारखा दुसरा चांगला मुहूर्त तरी कोणता?! आपण प्रयत्न करायला लागल्यावर २०१६ हे या वर्षाशी पण एक मस्त नातंच तयार होईल बघा. पुढे कधीतरी सांगू आपण इतरांना की, आमच्या सगळ्या सुंदर नात्यांना अधिकाधिक सुंदर करण्याची सुरुवात २०१६च्या पूर्वसंध्येला झाली- संकल्पांच्या सप्तपदीने!

नवीनवर्षानिमित्त आणि संकल्पपूर्तीसाठीही अनेक अनेक शुभेच्छा!